**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम**
योजना नुतनीकरण निधीमधून (ARF)
घ्यावयाच्या कामांबाबत मार्गदर्शक
सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक देप्रोअ-१३०८/प्र.क्र.८९/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ३० जुलै, २००८**

**वाचाः** १) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापापु-१००७/प्र.क्र.२३३/पापु-०७,
दिनांक २० मे,२००८.

**प्रस्तावनाः**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदांना जिल्हा नियोजन व विकास मंडळ, राज्यस्तरावरील सर्वसाधारण, विशेष घटक योजना, आदिवासी उपयोजना, बिगर आदिवासी उप योजना महाजल तसेच केंद्र शासनाचा वर्धित वेग कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमातून निधी उपलब्ध होतो. उपलब्ध होणारा हा निधी देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान म्हणून शासनाच्या संदर्भाधिन शासन निर्णयान्वये ग्रामपंचायतींना वितरित करण्यासाठी जिल्हा परिषदांना उपलब्ध करून दिला जातो.

आर्थिक वर्ष २००८-२००९ पासून देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान वितरणासाठीचे सुत्र संदर्भाधिन शासन निर्णयान्वये नव्याने निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार चालू आर्थिक वर्षापासून देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान राज्यातील ग्रामपंचायतींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुज्ञेय ठरणार असून त्याचे वितरण पाणी पट्टीच्या वसूलीशी निगडीत करण्यात आले आहे. ग्रामपंचायतींना वितरित होऊन शिल्लक राहिलेला निधी हा जिल्हा स्तरावर **योजना नुतनीकरण निधी (ARF)** म्हणून राखून ठेवण्यात येईल. तसेच या निधीतून घ्यावयाच्या कामांबाबत स्वतंत्रपणे सूचना देण्यात येतील, असेही संदर्भाधीन शासन निर्णयाच्या परि.१० नुसार स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार योजना नुतनीकरण निधीतून घ्यावयाच्या कामांबाबत मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रकः**

जिल्हा परिषदांकडे जमा होणा-या योजना नुतनीकरण निधीतून खालीलप्रमाणे कामे घेण्यात यावीत.

**(अ) तांत्रिक बिघाडामुळे गेल्या एक वर्ष व त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी बंद असलेल्या योजना.**

- १५ वर्षापेक्षा जास्त जुन्या एसी (सिमेंट) पाईपलाईन्सच्या तुटफुटीमुळे बंद असलेल्या योजना.

- पाच वर्ष व त्यापेक्षा जास्त कालावधीच्या पंपीग मशिनरी नादुरुस्तीमुळे बंद असलेल्या योजना.
- वितरण व्यवस्था निकामी ठरल्याने बंद असलेल्या योजना (ज्यांची वितरण व्यवस्था १५ वर्षे व त्यापेक्षा जास्त जुनी झालेली आहे.)
- स्रोत निकामी ठरल्याने बंद असलेल्या योजना. मात्र, ज्या स्रोतांची मोठी दुरुस्ती अपेक्षित आहे व ती झाल्याने त्या कार्यान्वित होऊ शकतील, अशा योजना).
- साठवण व्यवस्था (ESR, GSR इत्यादी) निकामी ठरल्याने बंद असलेल्या योजना

या योजना, योजना नुतनीकरण निधीतून पुनर्जिवित करण्यासाठी त्यांनी खालील अटींची पुर्तता करणे गरजेचे आहे.

१. योजनेतील सर्व स्टॅंड पोस्ट्सचे सामुहिक किंवा बिगर घरगुती / घरगुती कनेक्शन्स मध्ये रुपांतर करण्यात येईल, असा ठराव संबंधित ग्रामपंचायतीने द्यावा. त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु करावी.

२. ग्रामपंचायत योजनेच्या वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्चाचे अंदाज पत्रक तयार करेल. त्यानुसार पाणी पट्टीच्या दरांचे पुनर्विलोकन करून, योजनेचा देखभाल दुरुस्ती खर्च पाणी पट्टीच्या वसूलीतून भागेल, याप्रमाणे नियोजन करून त्याप्रमाणे पाणी पट्टीची आकारणी करील, असा ठराव ग्रामपंचायतीने सादर करावा.

३. गाव हागंदरीमुक्त झालेले नसेल, तर सदर योजनेचे काम पूर्ण होण्याच्या आत हागंदरीमुक्त करण्यात येईल, असा ठराव ग्रामपंचायतीने द्यावा. त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु करावी.

४. दुरुस्ती खर्चाच्या एकूण किमतीच्या १० टक्के रक्कम लोकवर्गणीच्या रुपाने जमा करण्याबाबतचा ठराव ग्रामपंचायतीने करावा.

**(ब) ज्या योजना चालू स्थितीत आहेत मात्र त्यांची खालील प्रमाणे मोठ्या तांत्रिक दुरुस्तीची आवश्यकता आहे अशा योजना.**

- ज्या योजनांमध्ये वापरण्यात आलेल्या पाईपलाईन्स ह्या एसी (सिमेंट) पाईपलाईन्स असतील व त्या १५ वर्षापेक्षा जास्त जुन्या झालेल्या असतील, त्यांच्यामध्ये होणा-या तुटफुटीमुळे त्या वारंवार दुरुस्त कराव्या लागत असतील तर, अशा योजनांच्या पाईपलाईन्स बदलण्यासाठी.

- ज्या योजनांची पंपींग मशिनरी पाच वर्ष व त्यापेक्षा जास्त कालावधीची झालेली आहे. तिच्या दुरुस्तीसाठी वारंवार खर्च येतो किंवा ती नव्याने बसविण्याचा खर्च जास्त आहे, अशा योजना.

- ज्या योजनांच्या साठवण व्यवस्थेमध्ये मोठ्या दुरुस्त्या करण्याची गरज आहे अशा योजना.

योजनांच्या दुरुस्तीसाठी त्यांनी खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

अ) या योजनांच्या पाणी पट्टीची वसूली (योजना सुरु झाल्यावर) १०० टक्के असावी.

ब) योजनेमध्ये १०० टक्के बिगर घरगुती घरगुती नळ जोडण्या दिलेल्या आहेत (योजनेतील सर्व स्टॅण्ड पोस्टचे सामुहिक तथा घरगुती नळ कनेक्शनमध्ये रुपांतर केलेले आहे, अशा योजना)

क) भूजलातील स्रोतावर आधारित असणा-या योजनांच्या बाबतीत, योजनेच्या स्रोत बळकटीकरणासाठीच्या उपाययोजना केलेली गावे (स्रोत बळकटीकरणाची उपाययोजना प्रस्तावित केलेली आहे, त्यासाठीची १० टक्के लोकवर्गणी जमा करून ती संबंधित खात्यात जमा केलेली आहे, अशी गावे देखील विचारात घेता येतील).

ड) या योजनांमधील बिगर घरगुती नळ कनेक्शन्सना १०० टक्के मीटर बसविलेले असणे.

इ) १०० टक्के हागंदारीमुक्त झालेली गावे.

ई) दुरुस्ती खर्चाच्या एकूण किमतीच्या १० टक्के रक्कम लोकवर्गणीच्या रुपाने जमा करण्याबाबतचा ठराव ग्रामपंचायतीने करावा.

२. संबंधित ग्रामपंचायतीने योजनेच्या प्रस्तावित दुरुस्तीचे काम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून जास्तीतजास्त तीन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावे. विशिष्ठ परिस्थितीत यापेक्षा जास्त कालावधी लागणार असेल, तर तसा उल्लेख प्रस्तावात करावा.

३. प्रस्तावित दुरुस्तीस मागणी आधारित समूह सहभागाचे धोरण लागू असेल. त्यानुसार दुरुस्ती प्रस्तावाच्या १० टक्के खर्च ग्रामपंचायतीस करावा लागेल, तर ९० टक्के रक्कम जिल्हा स्तरावरील योजना नुतनीकरण निधीतून उपलब्ध करून देण्यात येईल.

४. वरीलप्रमाणे निकष पूर्ण करणा-या ग्रामपंचायतीनी आपले प्रस्ताव जिल्हास्तरावरील जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीस सादर करावेत. जिल्हा जलव्यवस्थापन समितीने विहित कार्यपद्धतीचा वापर करून या प्रस्तावांना सहमती द्यावी. समितीने या प्रस्तावांना **सहमती देताना तांत्रिक बिघाडामुळे गेल्या एक वर्ष व त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी बंद असलेल्या योजनांच्या दुरुस्ती**

प्रस्तावांना प्राधान्य देण्यात यावे. सहमती देताना समितीने या योजना प्रस्तावित काम केल्याने प्रत्यक्ष कार्यान्वित होणार आहेत, किंवा कसे, तसेच, सदर प्रस्ताव तांत्रिकदृष्ट्या परिपुर्ण आहेत, किंवा कसे याबाबतची सविस्तर छाननी करावी.

५. योजनांच्या दुरुस्तीच्या कामांना जिल्हा जलव्यवस्थापन समितीने सहमती दिल्यानंतर पहिला हप्ता म्हणून दुरुस्ती खर्चाच्या ४५ टक्के रक्कम ग्रामपंचायतीस तातडीने उपलब्ध करून द्यावी. दुसरा हप्ता अदा करण्यापुर्वी ग्रामपंचायतीने अटी व शर्तींची पुर्तता केली आहे, याची खातरजमा करण्यात यावी.

६. संदर्भाधिन शासन निर्णयान्वये निर्माण केलेल्या योजना नुतनीकरण निधीचे स्वतंत्र लेखे जिल्हा परिषदेने ठेवावेत.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०७३११२०७२४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. राजन खोब्रागडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने